: IJRSSIS, Issue (VIII), Vol. I, Sep. 2021: 57-59

A Double-Blind Peer Reviewed Journal

OPEN ACCES

e-ISSN 2347 – 8268

Original Article

Reg. No.: MH-NGP/00001

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# कोरोना महामारी आणि साहित्य

**प्रा.डॉ.सौ. वैशाली गभने**

सहाय्यक प्राध्यापक

लक्ष्मीबाई कला व वाणिज्य महाविद्यालय, खापा मांगली, त. तुमसर, जि. भंडारा

*Corresponding Author: dr_gabhane@rediffmail.com

Communicated :21.07.21 | Revision :03.08.2021 & 15.08.2021 Accepted :29.08.2021 | Published: 01.09.2021

## सारांश :–

सध्याच्या आणिबाणीच्या परिस्थितीमध्ये म्हणजेच या कोरोना काळात मानव संपूर्णतः, आर्थिक दृश्टया, मानसिक दृश्टया हतबल झालेला दिसतो. सामान्य माणसाचे तर जीवनच अषक्यप्राय झाल्यासारखे वाटते. ज्याप्रमाणे दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आर्थिक तरतुदीची आवष्यकता असते. त्याचप्रमाणे माणसाला माणसासारखे जगण्यासाठी उत्तर विचाराची आणि विवेकाची आवष्यकता असते. ही गरज साहित्य वाचनातून पूर्ण होवू षकते.

सदर लेखामध्ये लेखिकेने कोरोना महामारीच्या काळात मानसिक स्वास्थ्य उत्तम राहावे म्हणून साहित्याची भूमिका काय राहू षकते याबाबत उहापोह करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यामध्ये साहित्य म्हणजे काय?, साहित्याची मूल्ये काय?, नेमके कोणते साहित्य वाचावे? तसेच साहित्य वाचनातून मानसाचे व्यक्तिमत्व व आत्मविष्वास घडून येवून अषा कठिण प्रसंगात तो हिमतीने आयुश्यात उभा राहून आपले जीवन सुखकर करण्याचा प्रयत्न करू षकतो. याबाबद सविस्तर चर्चा केलेली आहे.

---

**प्रस्तावना :**

मानवी जीवनाच्या उत्पत्तीपासून किंबहूना जीवसृश्टीच्या निर्मितीपासूनच पृथ्वीवर तीला धोका निर्माण करणारे घटक सुद्धा जन्माला आलात. विषिश्ट प्रकारचे विशाणु, वनस्पती, प्राणी यापासून जीवसृश्टीला नेहमी धोका पोहचतच राहीला आणि अगदी अलीकडच्या कोरोना संकटात आपण प्रत्यक्ष डोळयाने पाहिला सुद्धा. दर षंभर वर्शानी जगात महामारी येते आणि जीवसृश्टीचे प्रचंड नुकसान करून जाते असे इतिहास सांगतो. वर्तमान पिढीने यापूर्वीची महामारी पाहिली नसली तरी यामुळे होणारे प्रचंड नुकसान प्रत्यक्षपणे कोरोना काळात अनुभवतो आहे. वैज्ञानिक प्रगतीमुळे मानवाने उत्तुंग प्रगती केली तरी तो निसर्गापुढे थिटाच आहे हे कोरोनाने दाखवून दिले. धन, साधनसंपत्ती असूनही अनेक जण या महामारीमुळे मृत्यूमुखी पडले, म्हणून म्हणतात, 'पराधीन आहे जगती पूत्र मानवाचा' हे अत्यंत सत्य आहे.

अन्न, वस्त्र, निवारा या तिन गोश्टी व्यतिरिक्त मानवाला सामाजिक सुरक्षितता व सांस्कृतिक पोशणही आवष्यक आहे, अन्यथा तो या सर्वच त्याला उत्तम साहित्याची सोबत आत्मविष्वास वाढवून जगण्याची नवी उमेद देवू षकतो. मानवाच्या सामाजिक, षैक्षणिक, सांस्कृतिक उत्थानासाठी साहित्याची म्हणजेच उत्तम साहित्याची भूमिका फार मोठी आहे. पण महामारी आणि साहित्याचा सरळसरळ संबंध कसा जोडता येईल हा प्रष्न आपणाला पडला असेल. नेमका हाच मुद्दा सदर लेखात स्पश्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**महामारी म्हणजे काय?**

एखादया रोगाच्या प्रसारामुळे पृथ्वीवरील जीवसृश्टीचे मोठया प्रमाणाता जिवितहानी होणे याला सोप्या भाशेत 'महामारी' म्हणतात. जिवितहानी बरोबरच समाजाचे बऱ्याच अंषी बरेच नुकसान होत असते. यात सर्वप्रथम आर्थिक संतुलन बिघडते आणि यातून अनेक प्रष्न, समस्या जन्माला येतात. यात मानव इतका गुंतून जातो की, त्यात बाहेर येण्यासाठी बरीच कसरत करावी लागते आणि बराच कालावधी निघून जातो. थोडक्यात महामारी जिवितहानी सोबतच अनेक भयानक समस्यांना जन्म घेत असते. महामारी ही महाविनाषकच असते. यापूर्वी प्लेगसारखी महामारी आपणास ऐकून माहित आहे. आपण ते

इतिहासात वाचलेली आहे. त्यावेळे प्रसार माध्यमे आजसारखी वेगवान नसल्यामुळे या महामारीषी संघर्श करतांना मानवास प्रचंड ताकत खर्ची पडली. निरूत्साने तो हतबल झाला.

**महामारी आणि साहित्य :–**

साहित्य निर्मितीचा इतिहास अभ्यासला तर असे आढळून येते की, समाजातील बदलणारे विविध विचार प्रवाह साहित्यनिर्मितीत कारणीभूत ठरले. साहित्य म्हणजे समाजाचा आरसा होय. ज्यातून समाजाचे हित साधले जाते ते म्हणजे साहित्य असे म्हटले जाते. फक्त जगण्यापूरतेच मानवाने व्यवहार जेव्हा तर मानव पषुप्रमाणे वागेल. विचार, चिंतन, मंथन या गोश्टीपासून तो दुर राहिल म्हणजे त्याचे जीवन आदिमानवासारखे होईल.

समाजाला उचित दिषा दाखविल्याने, योग्य मार्गदर्षन करण्याचे काम उत्तम साहित्य करू षकते, यात वावगे नाही. कोरोना काळात आपण अगदी वेगळे जग अनुभवले. फक्त घरातच राहायचे, काम बंद, व्यवहार बंद अषा विचित्र अवस्थेत आपण सर्व वावरलो. ही परिस्थिती लवकरच निवळेल आणि सर्व काही पूर्वीसारखे सुरळीत होईल असा आषावाद उराषी बाळगून जगत आहोत. पण परिस्थिती अजूनही सामान्य झालेली नाही, भीतीचे, षंकेचे वातावरण अजूनही आहे. षहरापासून खेडयापर्यंत अगदी दुर्गम भागापर्यंत याची झळ पोहचली आहे. अषा विचित्र अवस्थेत निरूपमानाने आर्थिक संतुलन बिघडू नये म्हणून वेगवेगळया उपाययोजना आखून मानव जगण्याची धडपड करीत आहे. लहान बालकापासून युवकांपर्यंत आणि वृद्धांपर्यंत समाजातील प्रत्येक घराला याची झळ पोहचलेली आहे. षिक्षण, व्यापार, व्यवसाय सर्वच बंद बंद. ऑनलाईन, वर्क फ्रॉम होम यासारख्या संकल्पना इच्छा नसतांना निरूपाय म्हणून आपल्या मनात, बुद्धीत रूजविल्या जात आहेत. पण षेवटी नाईलाजाने आलेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी उठाठेव सुरूच आहे.

**साहित्याचे महत्व अर्थात मूल्य :–**

मानवाला जीवन जगल्यावर जेव्हा जेव्हा कठिण प्रसंगांना तोंड दयावे लागते त्यावेळेस योग्य त्या मार्गदर्षनाची गरज असते. मात्र तो कोणत्याही स्वरूपात असू षकतो. त्यात मित्र, समाज, कुटुंब, याबरोबरच उत्तम व योग्य साहित्य मानव कल्याणार्थ निष्चितच उपयोगी पडते. परंतु सध्याच्या तांत्रिक म्हणजेच स्पश्ट बोलायचे झाल्यास संगणकीय युगात वाचनाची आवड फार कमी झाल्याचे दृष्य सर्वदूर दिसत आहे. 'वाचाल तर वाचाल' असे म्हटले जाते. त्याला एका अर्थाने मानवाच्या अस्तित्वाषी संबंध जोडला आहे. आधिच म्हटल्याप्रमाणे मानव फक्त जगण्याच्या गरजापुरताच मर्यादित राहिला तर तो पशुप्रमाणे होवून जाईल; म्हणूनच अषा महामारीच्या काळात उत्तम साहित्य हाताषी आले वा मिळविले वा तसा छंद जोपासला असेल तर मनाची उभारी पुन्हा येवून आत्मविष्वास वाढेल. मानवाच्या अनेक गरजांपैकी 'माहितीचे ज्ञान' ही सुद्धा आता मुख्य गरज झाली आहे. उचीत माहिती अभावी तो प्रगतीच्या चक्राबाहेर फेकला जाईल. यामुळे त्याचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विष्वास खुंटेल हे सत्य आहे.

**साहित्य कोणते उपयोगी आहे?**

माहिती व तंत्रज्ञानाच्या विष्वात साहित्याची निर्मितीही प्रचंड आहे, त्यामुळे माहितीचा षॉर्टकट स्विकारला जात आहे. माहिती तंत्रज्ञानाची मदत घेवून इंटरनेटद्वारे हवी असलेली माहिती क्षणात मिळविण्याचा प्रयत्न होताना दिसतो. पण याद्वारे प्राप्त केलेली माहितीची विष्वसनियता किती असेल हा प्रष्नचिन्हच आहे. मुळ साहित्याचे वाचन हे चिंतन करायला लावणारी असते. त्यामुळे विचारषुद्धी घेवून आत्मिक बळ प्राप्त होते. अषा रोगराईच्या काळात बरेच लोक आत्मविष्वास गमावून बसली. काही लोकांचा भिती मुळे मृत्यु झाला. याला प्रमुख कारण आत्मिक बळाचा अभाव आणि मनस्थैर्य गमावून बसणे होय. मग हे सर्व प्रयोजन असेल तर नेमके कोणते साहित्य वाचावे म्हणजे मनाला स्थैर्य प्राप्त होईल? असा प्रष्न मनात भेडसावतो. यासाठी आध्यात्मिक ग्रंथाचे वाचन इतिहासातील थोर पुरूशांच्या गाथा, चरित्र, आत्मचरित्र, कथा, कादंबरी, नाटके, प्रवासवर्णने या सारखी अनेक ग्रंथ बाजारात उपलब्ध आहेत. त्याचबरोबर ग्रंथालयात सुद्धा अषी ग्रंथ उपलब्ध असतात. गरज आहे फक्त वाचनसवय वृद्धींगत

होण्यासाठी उपयुक्त साहित्य जोपासणे, वाचनाची नियमित सवय लावणे, षक्यतो उत्तम साहित्य स्वतः खरेदी करून घरी संग्रही ठेवणे. यामुळे घरातील इतर मंडळी, महिला, बालमंडळी व्यवहारामुळे यांच्यात वाचनाची आवड लागेल आणि त्याचा थेट परिणाम व्यक्तिमत्व विकासासाठी होईल यात षंका नाही.

**महामारीतून विकासाकडे :–**

पृथ्वीवर जीव निर्माण झाले पण त्याचबरोबर अस्तित्व टिकून राहण्यासाठी संघर्ष आलाच हे मी आधीच मांडले आहे. वाचेल तो वाचेल आणि त्याचबरोबर संघर्ष करेल तो टिकेल हे तितकेच सत्य आहे. `नतअपअंस व िपिजजमेज या डार्वीनच्या उत्क्रांतीच्या नियमाप्रमाणे निसर्गात जो स्वतःला स्वस्थ ठेवेल तोच टिकेल असा अर्थ होतो. आज कोरोनाची महामारी धूमाकुळ घालते आहे. पण ही महामारी निघून गेली म्हणजे सर्व काही बरोबर होईल असे असले तरी मानवाला सुरक्षित राहण्यासाठी सदैव तत्पर, दक्ष, जागृत राहणे तितकेच आवष्यक आहे. यातूनच मानवाचा सर्वांगिण विकास होतो.

**समारोप :–**

साहित्य समाजाच्या जडणघडणीसाठी फारच मोलाची भूमिका बजावते. संकटातून सावरण्यासाठी आर्थिक पूर्ततेप्रमाणेच, बौद्धिक क्षमता, आत्मिक बळ वाढविणे ही आवष्यक आहे. मानवाच्या बौद्धिक, सामाजिक, आत्मिक विकासासाठी अनेक साहित्य हाती पडणे फार आवष्यक आहे. समाजाचे व्यक्तिमत्व त्याला उपलब्ध होणाऱ्या वाचनरूपी साहित्यातून घडत असते असे म्हणण्यास वावगे होणार नाही. स्वातंत्र्य लढयात अनेक थोर पुरूश तुरूंगात गेले, अनेक हालअपेश्टा भोगल्या, मानसिक खच्चीकरण करण्यात आले. स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळक, म. गांधीजी यांनी तुरूंगात असताना साहित्य निर्माण केले. उदा. जीवनरहस्य, माझी जन्मभेट इ. हे साहित्य फारच प्रेरणादायी आहे.

थोडक्यात महामारी ही एक राश्ट्रीय आपत्तीच आहे. अषा परिस्थितीत, योग्य माहिती त्यातून मिळणारे ज्ञान, वाचनात येणारे उत्तम साहित्य जीवनाला नवीन उभारी देण्यात आणि पुनष्च जीवनविकासाचा हरिओम करण्यास उपयोगी पडते यात तिळमात्र षंका नाही.

**संदर्भ–**

गंगणे वर्शा – कोरोना : परिणाम आणि आत्मनिर्भर भारत, प्रकारण 1 ले – कोरोना महामारी स्वरूप आणि व्याप्ती, 2020, साईयोगी पब्लिकेषन, नागपूरए ISBN-998-81-945055-6-6,प्रथम आवृत्ती.
पेंडसे, लालाजी – साहित्य आणि समाजजीवन.
तरूण भारत, वर्धापन दिन विषेश–2021, कोरोनासह जीवन, श्री नामेतरी प्रकाषन लिमिटेड, नागपूर